ला. प्र. वि.

अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- १७/०७/२०२६

## -: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १९/२०२६ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | श्री. सुधीर मुरलीधर वाघमारे, पो.ह.क्र. ६८३/कुर्ला लोहमार्ग पोलीस ठाणे, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. १०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ३,०००/- लाचेची मागणी |
| पडताळणी दिनांक | दिनांक ०२/१२/२०२५ |
| लाच स्विकारलेली रक्कम | नाही |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे चप्पल दुरूस्ती व विक्रीचा व्यवसाय करतात. दिनांक २४/११/२०२५ रोजी तक्रारदार यांना लोकसेवक वाघमारे, पोलीस, कुर्ला लोहमार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी मोबाईलवर संपर्क करून तक्रारदार हे वापरत असलेला मोबाईल चोरीचा असून पोलीस ठाणेस भेटण्यास बोलाविले. त्यानुसार तक्रारदार हे दिनांक २६/११/२०२५ रोजी लोकसेवक यांना भेटण्यास गेले असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांना '''मी तुला सोडतो, तु जर कोर्टात गेला तर रू. १५,०००/- जामीनासाठी लागतील व रू. ५,०००/- रुपये वकीलाचा खर्च लागेल, त्यापेक्षा तु मला रू. १०,०००/- दे. मी तुला सोडतो'' असे सांगून लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २८/११/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकांविरूध्द लेखी तक्रार केली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०२/१२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. सुधीर वाघमारे, पोलीस अंमलदार, कुर्ला लोहमार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी तक्रारदार यांना त्यांचेवर करवाई न करण्याकरीता तडजोडीअंती रु.३,०००/- लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. मनोज गोडसे, पोलीस निरीक्षक
मार्गदर्शक अधिकारी :- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अनिल घेरडीकर )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**हेल्पलाईन क्र.** :- **1064,** **दूरध्वनी क्र.** :- **022-24921212,**
**फॅक्स क्र.** :- **022-24922618** **व्हॉट्सअप क्र.** :- **8828241064**
**वेबसाईट** :- **acbmaharashtra.gov.in,**
**ईमेल** :- **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**